# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेस नोट ता.२२/०२/२०२०

## चोरी,घरफोडी,वाहन व मोबाईल चोरी करणा-या गुन्हेगारांना अटक करुन सुमारे अडीच लाखाचा मुदेमाल जप्त

## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात घडणा-या चो-यांचा गुन्हे शाखा युनिट २ कडून पोलीस ठाणेंकडे दाखल गुन्हयांचा समांतर तपास करीत असतांना निगडी पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ३४२/२०१८ भादवि कलम ३७९ प्रमाणे दाखल गुन्हयातील पॅशन मोटर सायकल चोरीबाबतगुन्हे शाखा युनिट २ कडील नेमणुकीचे पोलीस हवालदार शिवानंद स्वामी यांना त्यांचे गोपनीय बातमीदाराकरवी मिळाले बातमीवरुन युनिट २ कडील अधिकारी व कर्मचारी यांचे पथकाने डेअरी फॉर्म रोड पिंपरी परिसरात सापळा लावुन संशयितरित्या फिरणा-या मुबारक मज्जीत कुरेशी वय १९ वर्षे रा. वारजे माळवाडी पुणे यास व त्याचा एक अल्पवयीन साथीदार यांना पॅशन मोटर सायकल, मोबाईल ९ हॅंडसेट, इलेक्ट्रीक पॉली कॅब नविन वायरचे बंडल व प्लंबींगचे जागवार कंपनीचे नविन महागडे मटेरिअल अशा साहीत्यासह ताब्यात घेवून सखोल चौकशी करता पॅशन मोटर सायकल निगडी पोलीस ठाणे, चिंचवड पोलीस ठाणेकडील मोबाईल चोरीचे एकूण तीन गुन्हे, पिंपरी पोलीस ठाणेकडील मोबाईल चोरीचा एक गुन्हा, डेक्कन पोलीस ठाणेकडील पाच मोबाईल हॅन्डसेट चोरीचा गुन्हा व इलेक्ट्रीक वायर व जागवार कंपनीचे प्लंबीगचे मटेरिअल चोरीचा गुन्हा असे एकुण ७ गुन्हे उघडकीस येवून सुमारे अडीच लाख रुपयाचा चोरीस गेलेला मुदेमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचे आरोपीत हे भंगार गोळा करण्याचे बहाण्याने नागरी वस्तीत फिरुन पाहणी करुन उघडया दरवाजातून आत प्रवेश करतात व मिळेल त्या वस्तुची चोरी करीत असतात. तरी नागरीकांनी याबाबत दक्षता घेवून अशा संशयित इसमांची माहीती तात्काळ स्थानिक पोलीस ठाणे / गुन्हे शाखा व नियंत्रण कक्षास कळवावी तसेच सोसायटी मधील वॉचमन यांना सर्तक राहण्याची सुचना करावी.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई, अप्पर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री सुधीर हिरेमठ, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री आर आर पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट २ चे पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड, पोलीस उप निरीक्षक निलपत्रेवार, सहा.पो.फौजदार दिलीप चौधरी, संपत निकम, पोहवा. शिवानंद स्वामी, केराप्पा माने, मपोहवा उषा दळे, पोना विपूल जाधव, चेतन मुंढे, आतिष कुडके, शिवाजी मुंडे ,अजित सानप ,नामदेव राऊत, यांचे पथकाने केली आहे.